# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## देवमाता मरिया - ०१ जानेवारी २०२१

## सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना ः ख्रिस्तसभेची प्रार्थना किंवा ब्रिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. ख्रिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा, घरातल्या राजपिठासमोर मेणबत्त्या लावा, प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. ख्रिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

चरण: प्रभो, आमचे ओठ उघड.

प्रतिसाद: आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** आपण कुमारी मरियेचे मातृपद साजरे करू या. तिचा पुत्र ख्रिस्त आमचा प्रभू ह्याचा जयजयकार करू या.

स्तोत्र ६७

**दे**वाने आमच्यावर दया करावी व
आम्हाला आशीर्वाद द्यावा;
त्याने आपला मुखप्रकाश आमच्यावर पाडावा;
ह्यासाठी की, पृथ्वीवर तुझा मार्ग कळावा,
तू सिद्ध केलेले तारण सर्व राष्ट्रांना विदित व्हावे. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**हे** देवा, राष्ट्रे तुझी स्तुती करोत,
सर्व राष्ट्रे तुझी स्तुती करोत. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**रा**ष्ट्रे हर्ष करोत व जयघोष करोत;
कारण तू राष्ट्रांचा न्याय सरळपणे करशील.
व पृथ्वीवरील राष्ट्रांना मार्ग दाखवशील. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**हे** देवा, राष्ट्रे तुझी स्तुती करोत,
सर्व राष्ट्रे तुझी स्तुती करोत, आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**भू**मीने आपला उपज दिला आहे;
देव, आमचा देव, आम्हाला आशीर्वाद देवो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**दे**व आम्हाला आशीर्वाद देवो,
व पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचे भय धरो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** आपण कुमारी मरियेचे मातृपद साजरे करू या. तिचा पुत्र ख्रिस्त आमचा प्रभू ह्याचा जयजयकार करू या.

गीत ः नाताळ गीत

**प्रतिगीत १:** इशायाच्या बुंधाला धुमारा फुटलेला आहे. याकोबातून एक तारा उदयास आला आहे. कुमारीने तारणाऱ्याला जन्म दिला आहे. हे परमेश्वरा, आम्ही तुझे स्तवन करतो, आल्लेलुया.

**स्तोत्र ६३: २ - ९**

**हे** देवा, तू माझा देव आहेस;
मी आस्थेने तुझा शोध करीन;
शुष्क, रूक्ष व निर्जल प्रदेशात
माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे,
माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.
अशाप्रकारे तुझे बळ व वैभव पाहण्यास पवित्रस्थानी
मी तुझ्याकडे दृष्टी लाविली आहे.

**तु**झे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे;
माझे ओठ तुझे स्तवन करतील.
मी जिवंत आहे तोपर्यंत तुझा धन्यवाद असाच करीन;
तुझ्या नावाने मी आपले हात उभारीन.

मज्जेने व मेदाने व्हावा तसा माझा जीव तृप्त होईल,
आणि माझे मुख हर्षभरित होऊन तुझे स्तवन करील.

मी रात्री आपल्या अंथरूणावर पडून तुझे स्मरण करतो,
व प्रहरोप्रहरी तुझे ध्यान करीत असतो.
कारण तू माझे साहाय्य होत आला आहेस,
म्हणून तुझ्या पंखांच्या सावलीत मी आनंद करीन.
माझ्या जिवाने तुझी कास धरली आहे;
तुझा उजवा हात मला सांभाळून धरतो;

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: इशायाच्या बुंधाला धुमारा फुटलेला आहे. याकोबातून एक तारा उदयास आला आहे. कुमारीने तारणाऱ्याला जन्म दिला आहे. हे परमेश्वरा, आम्ही तुझे स्तवन करतो, आल्लेलुया.

********

प्रतिगीत २: मरियेने आपल्या तारणाऱ्याला जन्म दिलेला आहे, योहानाने पाहिले आणि साक्ष दिली, 'जगाची पापे दूर करणारे हे देवाचे कोकरू आहे,' आल्लेलुया.

काव्य - तीन युवकांचे गीत: ३५-६८

प्रभूच्या साऱ्या कृत्यांनो, त्याचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
तारामंडळांनो प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभूच्या दूतांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघातील जलांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
साऱ्या सत्तांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हे सूर्य आणि चंद्र, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
आकाशातील ताऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा

आणि  सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
जलधारांनो आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा .
त्याची स्तवने गा आणि  सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .

वाऱ्या वायुंनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
अग्नी आणि उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि  सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
हिवाळयातील थंडी आणि उन्हाळयातील उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .

हिम आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
बर्फ आणि थंडी, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
ओसकणांनो आणि हिमांनो, प्रभूचा धन्यवाद गा . त्याची स्तवने गा
आणि  सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .

रात्रींनो आणि दिवसांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
उजेड आणि अंधार, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
मेघांनो आणि विजांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .

पृथ्वीने प्रभूचा धन्यवाद गावा, त्याची स्तवने गावी
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करावी .

पर्वतांनो आणि टेकडयांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
पृथ्वीवर वाढणाऱ्या सर्व वनस्पतीनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .
अहो झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा .

सागरांनो आणि नद्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा

आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
देवमाशांनो आणि जलचरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हवेत संचारणाऱ्या सर्व पक्षांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पशूंनो आणि गुरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो मानवपुत्रांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो इस्त्राएली लोकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या पुरोहितांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या सेवकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

नीतिमानांच्या आत्म्यांनो आणि जीवांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पवित्र व विनयशील जनांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हन्नानिया, अझारिया आणि मिखाएल प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभू चांगला आहे म्हणून त्याचे आभार माना
कारण त्याची दया सनातन आहे.
प्रभू देवाधिदेव यांची उपासना करणाऱ्यांनो,
त्याचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि त्याचे आभार माना कारण त्याची दया सनातन आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची स्तुती करू या.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.
हे प्रभू, स्वर्गात तू धन्यवादित होवो.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.

**प्रतिगीत २:** मरियेने आपल्या तारणाऱ्याला जन्म दिलेला आहे, योहानाने पाहिले आणि साक्ष दिली,‘जगाची पापे दूर करणारे हे देवाचे कोकरू आहे,’ आल्लेलुया.

*(ह्या काव्यानंतर पिता, पुत्र... ही त्रैक्यस्तुती म्हणत नाही.)*

*******

**प्रतिगीत ३:** मरियेने राजाला जन्म दिला. त्याचे नाव शाश्वत आहे. तिच्याठायी मातेचा आनंद आणि कुमारीचा सन्मान एकत्र आलेले आहेत. असे कधी घडले नव्हते आणि यापुढे कधी घडणार नाही, आल्लेलुया.

स्तोत्र: १४९

परमेशाचे स्तवन करा,
नवे गीत गाऊन परमेश्वराचे गुणगान करा.
भक्तांच्या मंडळीत त्याचे स्तोत्र गा.
इस्राएल आपल्या निर्माणकर्त्याच्या ठायी आनंद करो;
सियोनेची मुले आपल्या राजाच्या ठायी उल्लास पावोत.
ती नृत्य करीत त्याच्या नावाचे स्तवन करोत.
डफ व वीणा ह्यावर त्याला स्तोत्रे गावोत.

कारण परमेश्वर आपल्या लोकांवर संतुष्ट आहे;
तो दीनांना तारणाने सुशोभित करितो.
भक्त गौरवामुळे उल्लासोत;
ते आपल्या अंथरूणांवरून हर्षघोष करोत.
परमेश्वराची परमश्रेष्ठ स्तुती त्यांच्या कंठी असो;
दुधारी तरवार त्यांच्या हाती असो;

तिच्या योगे राष्ट्रांचा सूड त्यांनी उगवावा
आणि लोकांना शासन करावे.
त्यांच्या राजांना साखळदंडांनी बांधावे
आणि त्यांच्या सरदारांना लोखंडी बेडया घालाव्या.
लिहून ठेविलेला निवाडा त्यांच्यावर बजवावा,
हे त्याच्या सर्व भक्तांना भूषण होईल.
परमेशाचे स्तवन करा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३ :** मरियेने राजाला जन्म दिला. त्याचे नाव शाश्वत आहे. तिच्याठायी मातेचा आनंद आणि कुमारीचा सन्मान एकत्र आलेले आहेत. असे कधी घडले नव्हते आणि यापुढे कधी घडणार नाही, आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** मीखा ५ : ३-४, ५अ

यास्तव वेणा देणारी प्रसवेल तोवर देव त्यांस परक्यांच्या अधीन करील; मग त्यांचे अवशिष्ट बांधव इस्त्राएलच्या वंशजांसह परत येतील. तो परमेश्वराच्या सामर्थ्याने, आपला देव परमेश्वर याच्या नामाच्या प्रतापाने उभा राहील. तो कळप चारील आणि ते वस्ती करितील, कारण त्याची थोरवी पृथ्वीच्या दिगंतापर्यंत पसरेल. हा पुरूष आम्हास मूर्तिमंत शांती होईल.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: परमेश्वराने त्याचे तारण प्रकट केले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: परमेश्वराने त्याचे तारण प्रकट केले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: त्याने त्याची तारणदायी कृपा प्रकट केली आहे.
प्रतिसाद: परमेश्वराने त्याचे तारण प्रकट केले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: परमेश्वराने त्याचे तारण प्रकट केले आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** आज एक अद्भुत रहस्य जाहीर करण्यात आले आहे. काही तरी नवीन घडले आहे. देव माणूस झालेला आहे. तो जसा आहे तसाच राहिला आहे आणि जसा नाही तसा बनलेला आहे. त्याचे दोन स्वभाव वेगवेगळे असले तरी तो एकच आहे.

जखऱ्याचे स्तोत्र

इस्त्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची ‘खंडणी भरून सुटका’ केली आहे;

आणि आपल्यासाठी त्याने आपला दास ‘दावीद'
ह्याच्या घराण्यात ‘बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;’

म्हणजे आपल्या 'शत्रूंच्या' व आपला 'द्वेष करणाऱ्या'
सर्वांच्या 'हातून' सुटका करावी;
अशासाठी की, 'आपल्या पूर्वजांवर' त्याने 'दया' करावी.
आणि त्यानें 'आपला' पवित्र 'करार' म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज 'अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली', ती 'स्मरावी',

ती अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

आणि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण 'प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे' चालशील;

ह्यासाठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.
आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

'ह्यासाठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा',
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** आज एक अद्भुत रहस्य जाहीर करण्यात आले आहे. काही तरी नवीन घडले आहे. देव माणूस झालेला आहे. तो जसा आहे तसाच राहिला आहे आणि जसा नाही तसा बनलेला आहे. त्याचे दोन स्वभाव वेगवेगळे असले तरी तो एकच आहे.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

**प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

कुमारी मरियेपासून पवित्र आत्म्याच्या योगे जन्मलेल्या ख्रिस्ताचा आपण गौरव करू या. **प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

कुमारी मरियेच्या पुत्रा, तू अद्भुत बालक आणि शांतीचा राजपुत्र आहेस. संपूर्ण जगात तुझी शांती पसरू दे. **प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

हे प्रभो, तुझ्यावरील आमची श्रद्धा दिवसेंदिवस भक्कम होऊ दे आणि आमच्या आचरणातून ती व्यक्त होऊ दे. **प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

**तू** आमच्या मानवी स्वभावात सहभागी झालास - आम्हाला तुझ्या दैवी जीवनात वाढण्यास कृपा दे. **प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

**तू** आमच्या ऐहिक जगाचा नागरिक बनलास - आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्याचे नागरिक बनव. **प्रतिसाद:** कुमारी मरियेच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

**आ**मच्या स्वर्गीय बापा ...

**समारोपाची प्रार्थना**

हे आमच्या परमेश्वर बापा, आमची माता धन्य कुमारी मरिया, हिच्याद्वारे तू मानवजातीला तारणारा दिलास. तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त, ह्याच्यासह जेव्हा ती आमच्यासाठी प्रार्थना करते तेव्हा आम्हाला तिच्या मध्यस्थीच्या सामर्थ्याचा अनुभव येऊ दे. तो जीवनाचा स्वामी आहे. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

**समारोप विधी:**

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

**प्रतिसाद:** आमेन.

(धर्मप्रांतीय उपासना आयोग फा. रॉबर्ट डिसोजा हयांच्या अथक परिश्रमाबद्दल तसेच सहाय्य करणा-या सर्वांचा ऋणी आहे.)